महासागर अमरावती
मंगळवार, दि. 1 ऑक्टोंबर 2024
पान 3

# कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

महासागर प्रतिनिधी


**मोर्शी,( दि.30 )-** मालवीय गार्डन स्थित एका 42 वर्षीय युवा शेतकऱ्याने कर्जबाजारीपणाला कंटाळून विष प्राशन करून आत्महत्या केली. पवन गोपालदास बंग वय (42) असे मृताचे नाव आहे. ही घटना 29 सप्टेंबर रोजी उघडकीस आली. मूळचे खानापूर येथील रहिवाशी पवन गोपालदास बंग हे मालवीय गार्डन येथे राहत होते. त्यांनी आपल्या शेतात बँकेचे तसेच खाजगी कर्ज घेऊन सोयाबीन कपाशीची पेरणी केली. मात्र यावर्षी निसर्गाच्या अवकृपेमुळे सतत झालेल्या पावसामुळे सोयाबीनला शेंगाच धरल्या नाही. कपाशीवर सुद्धा रोग आल्यामुळे पीक हातातून निघून गेले. या विवंचनेत पवन बंग हे नेहमीच राहत होते. दोन महिन्यापूर्वी त्यांचे वडील यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. या सर्व प्रकारची धास्ती घेऊन पवन बंग यांनी 29 सप्टेंबर रोजी रात्रीच्या सुमारास विषारी औषध प्राशन केले. पहाटे त्यांना उलटी होत असल्याचे पाहून त्यांनी विषारी औषध प्राशन केल्याचे लोकांच्या लक्षात आले. लगेच त्यांना अमरावती येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र त्या ठिकाणी प्रथमोपचारानंतर त्यांची प्राणज्योत मालवली. 30 सप्टेंबर रोजी त्यांचा मृतदेह मालवीय गार्डन स्थित राहत असलेल्या घरी आणण्यात येऊन त्यांची अंत्येष्टी स्थानिक मोक्षधाम येथे नेण्यात येऊन त्यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार पार पडले.

## सातपुडासह मेळघाटचा पायथा हादरला

# घरांना गेले तडे, भुस्खलन झाले, नागरिक भयभीत

### 4.2 रेक्टर स्केलची तीव्रता

### 30 वर्षांपुर्वीची आठवण ताजी




## आजच्या दिवशीच झाला होता लातूरच्या किल्लारी येथे भूकंप

*महासागर प्रतिनिधी*

*अमरावती,( दि.30 )- जिल्ह्यातील सातपुडा पर्वत रांगेत वसलेल्या चिखलदरा तालुक्यासह मेळघाटच्या पायथ्याशी असलेले अचलपूर आणि अंजनगाव सूर्जी तालुक्यातील अनेक भागांत आज सोमवारी( दि.30 ) दुपारी 1 वाजून 40 मिनिटाच्या सुमारास भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. अनेक गावाकऱ्यांनी हे भूकंपाचे हादरे अनुभवले. ज्यामध्ये काही ठिकाणी घरांना तडे गेले, तर पहाडावर भुस्खलन झाल्याची घटना समोर आली, या भूकंपामूळे काही काळ जिल्हाभर भीतीचे वातावरण पसरले होते. विशेष म्हणजे 30 वर्षांपुर्वी आजच्याच दिवशी 30 सप्टेंबर 1993 ला लातुरच्या किल्लारी येथे विनाशकारी भुकंप झाला होता. ज्याचे हादरे अमरावती जिल्ह्यातही जाणवले होते. सोमवारी झालेल्या भूकंपाने किल्लारी येथील घटनेची पुन्हा एकदा ताजी आठवण करुन दिली.*



### तीन ते चार सेकंदाचा हादरा

1 वाजून 41 मिनिटांनी तीन ते चार सेकंदाचे धक्के जाणवले. प्राथमिक अहवालानुसार जीवित हानी किंवा वित्त हानी झाली नाही. तरी नागरिकांनी प्राथमिकतेने काळजी घ्यावी. असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात येत

**जीवन मोरणकर, तहसीलदार, चिखलदरा.**

### शाळेतून मुलांना काढले बाहेर

मी वर्गखोली मध्ये मुलांना शिकवत असताना अचानक सौम्य प्रकारचा धक्का लागल्याने मी मुलांना बाहेर काढले. लगेच गावातूनही भूकंप झाल्याची माहिती मिळाली.

**संजय निघोट, जि.प.शिक्षक लवादा.**

1.4 रिश्टर स्केल एवढी तीव्रता असून तालुक्यातून अजून पर्यंत कुठलेही नुकसान झाल्याची माहिती मिळाली नाही.

**पुष्पा सोळंके**
**तहसीलदार अंजनगाव सुर्जी**

## नागरिक आले रस्त्यावर, शाळांना सुटी





**अचलपूर-** शहरातील हिरापूर भागात सोमवार दुपारी 1.40 मिनिटांनी भूकंपाचे दोन मोठे धक्के जाणवले, या धक्क्यांमुळे अशरफपुर, हिरापूर, अलवरपूरा परिसर तसेच गांधी पूल परिसरातही परिणाम दिसून आला. येथील एका घराला या भूकंपामूळे तडे ही गेले. घटनेच्या वेळी आपापल्या कामात व्यस्त असलेल्या नागरिकांना अचानक भूकंपाचे धक्के जाणवायला लागले. ज्यामुळे लोक घाबरून आपापल्या घरांमधून आणि कामाच्या ठिकाणांवरून बाहेर पडले. यावेळी अनवरपूर भागातील एका कच्च्या भिंतीला तडे गेले. त्याचप्रमाणे रहमानिया आणि जगदंबा क्रिएटिव्ह माइंड शाळांमध्ये मुलांना सुट्टी देण्यात आली. भूकंपाच्या धक्क्यांमुळे अचानक नेटवर्कही प्रभावित झाले. सुदैवाने या घटनेत कोणतेही मोठे नुकसान झाले नाही, अशरफपुरा आणि इतर काही भागात याची तीव्रता अधिकच जाणवली.

## चिखलदरा तालुक्यात सर्वाधिक हादरा


**चुरणी -** मेळघाटातील चिखलदरा तालुक्यात भूकंपाचा सर्वाधिक हादरा जाणवला. तसेच धारणीमध्येही भूंकपाचे हादरे बसले. ज्यामूळे नागरिक घराच्या बाहेर निघाले. आपोआप घरावरील टीन पत्रे थरथरायला लागल्याने नागरिकांना भूकंप झाल्याचे कळले. त्यानंतर प्रत्येकांनी एकमेकांना फोन लावून चौकशी करणे सुरु केले. यामध्ये कुठल्याही प्रकारची वित्त हानी किंवा जीवित हानी झालेली नाही. चिखलदरा शहरासह परिसरातील तालुक्यातील चुरणी ,काटकुंभ टेंब्रुसोंडा, खटकाली,अंबापाटी अशा अनेक गावांमध्ये भूकंपाचे सौम्या झटके जाणवले. चिखलदरा तालुक्यातील खटकाली हे गाव केंद्र असल्याचे समाजमाध्यमांवर चर्चा चर्वण केले जात होते.

## बसवर कोसळली दरड, प्रवासी थोडक्यात बचावले



भूकंपाचे धक्के जाणवत असताना इतरत्र कुठलीही नुकसान झाले नाही, परंतू परतवाडा येथून खोगडा मार्गे धारणीकडे जात असलेल्या परतवाडा डेपो एमएच 07/ सी 9482 या क्रमांकाच्या बसवर कोहा नजिक सर्वकाही सामान्य असताना अचानक दरड कोसळली. या ढीगाऱ्या मोठमोठे दगड पहाडावरुन खाली आले, जे सुदैवाने बसच्या मागच्या बाजूला जावून आदळले. यामध्ये एसटी बसचा मागिल काही भाग तुटून खाली पडला. परंतून आतमधील 30 ते 40 प्रवासी सुदैवाने बचावले. त्यानंतरही बसने सर्व प्रवाशांना सुखरूप धारणीला पोहचविल्याची माहिती परतवाडा आगार प्रमुख जीवन वानखडे यांनी 'दै.महासागर' ला दिली.

## अंजनगाव सुर्जी तालुक्यातही भूकंप





साधारण दुपारी दीड वाजताच्या दरम्यान काही सेकंद तालुक्यात भूकंपाचे धक्के बसत असल्याचे नागरिकांना लक्षात आले असून नागरिकांमध्ये काही क्षण प्रचंड भीती निर्माण झाली होती. नागरिक दुपारच्या सुमारास आपापल्या कामात व्यस्त असताना दुपारी 1.37 वाजता जमीन हालत असल्याचे निर्दर्शनास आले. तसेच नागरिक आपल्याला भास झाला की खरंच जमीन हलत आहे हे लक्षात न येत असल्यामुळे एकमेकांना विचारत होते तसेच बऱ्याच ठिकाणी नागरिक खुल्या जागेत येऊन उभे राहिले. तर काही नागरिकांना कामात व्यस्त असल्यामुळे सेकंदात काय झाले याची जाणीव सुद्धा झाली नाही. तालुक्यातील जवळपास सर्वच गावांमध्ये भूकंपाचा सौम्य धक्का बसल्याचे नागरिकांना जाणवले आहे. अचानक झालेल्या या घटनेमुळे काही लोक घाबरून घराबाहेर आले होते. शहरातील रेणुका नगर येथील रहिवाशी चेतन अंबादास आवंडकर यांच्या आई सुनंदा आवंडकर स्वयंपाक खोलीत स्वयंपाक करत असताना अचानक भांडे खाली कोसळले तसेच त्यांच्या आई सुद्धा जमीन हलल्यामुळे खाली पडल्या असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान अंजनगाव सुर्जी शहरासह तालुक्यातील चौसाळा, निमखेड बाजार, खिराडा, भंडारज, सातेगाव कारला,पांढरी, कापूसतळणी, धनेगाव, कोकर्डा तसेच इतरही गावात भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले.

# भूकंपामुळे कोणतीही हानी नाही

### नागरिकांनी सतर्क राहण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 30 ) -** जिल्ह्यात आज दि. 30 सप्टेंबर रोजी वेळ दुपारी 1.37 मिनिटांनी चिखलदरा तालुक्यातील टेटू आणि आमझरी भागामध्ये आणि लगतचे काही गाव, तालुक्यामध्ये भूकंपाचा धक्का जाणविल्याची माहिती मिळाली. या भूकंपामुळे कोणतीही हानी झाली नसून नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. या संदर्भातील तांत्रिक माहिती राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्र, नवी दिल्ली यांनी वेबसाईटवर भूकंपाची माहिती प्रकाशित केली आहे. यात 4.2 तिव्रता दर्शविली आहे. यासंदर्भात भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण मध्य विभाग नागपूर येथील भूवैज्ञानिकांशी संपर्क करण्यात आला आहे. त्यांच्याद्वारे क्षेत्रिय तपासणी करण्यात येणार असून त्यानंतर भूकंप किंवा हादऱ्याबद्दलची कारणे आणि इतर आवश्यक बाबींची माहिती प्राप्त होणार आहे.जिल्ह्यातील भूकंपाच्या धक्क्यामुळे कुठेही जिवीत किंवा वित्तहानी झाल्याबाबत माहिती प्राप्त झालेली नाही. याबाबत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने नागरिकांनी घाबरुन जाऊ नये, तसेच सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

# चांदूर रेल्वे नगर परिषदेने पटकावले 50 लाखाचे बक्षीस

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, ( दि. 30 ) -** माझी वसुंधरा अभियान 4.0 मध्ये 15 हजार ते 25 हजार लोकसंख्येच्या गटात चांदूर रेल्वे नगर परिषदने अमरावती विभागातून तिसरा क्रमांक पटकावीत 50 लाख रुपये बक्षीस पटकावले. पृथ्वी, वायू, जल, अग्नी आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्त्वांवर आधारित




%माझी वसुंधरा अभियान% हे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये 2 ऑक्टोबर 2020 ला राबविण्यास सुरुवात झाली होती. माझी वसुंधरा अभियान 4.0 हे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये 1 एप्रिल 2023 ते 31 मे 2024 या कालावधीत राबविण्यात आले. स्थानिक स्वराज्य संस्थांनी अभियान कालावधीत केलेल्या कामाचे डेस्कटॉप मूल्यमापन व फिल्ड मूल्यमापन त्रयस्थ यंत्रणांमार्फत करण्यात आले. या दोन्ही मूल्यमापनातील एकूण गुणांच्या आधारे माझी वसुंधरा अभियान 4.0 मधील लोकासंख्यानिहाय विजेत्या संस्थांची 27 सप्टेंबर रोजी निवड करण्यात आली. यात अमरावती विभागातून चांदूर रेल्वे नगर परिषदेने तिसरा क्रमांक पटकावून 50 लाख रुपये पारितोषिक रक्कम प्राप्त केले.

# मुस्लिम समाजाकडून आ.बच्चु कडूंवर आगपाखड

## आ.नितेश राणेंविरुध्द अचलपूरात गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.30 )-** मुस्लिम समाजाच्या वारंवार भावना दुखवित असतानाही आ.नितेश राणे यांच्या सभेला परवानगी कशी मिळते, असा प्रश्न विचारुन आ.बच्चू कडूंवरच मुस्लिम समाजातील काही लोकांनी आगपाखड केल्याचा प्रकार सोमवारी(दि.30) रहेमान दुल्हे शाह दर्ग्यावर घडला. यावेळी आ.बच्चू कडू उर्स प्रसंगी येथे भेट देण्याकरिता आले होते. दुसरीकडे चिथावणीखोर भाषण



केल्याप्रकरणी सागर बेग (रा. कोपरगाव, जि. नगर) व आमदार नितेश राणे यांच्याविरोधात अचलपूर पोलिस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले. इमरान खान असलम खान (28, रा. हिरापुरा गेट, अचलपुर) यांच्या तक्रारीवरुन भारतीय न्याय संहिता कलम 196 (1) अन्वये हा गुन्हा नोंद करण्यात आला.

या धर्मसभेच्या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते आमदार नितेश राणे यांच्या उपस्थितीत बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. बाईक रॅलीनंतर कृषी उत्पन्न बाजार समिति येथील आयोजीत धर्म सभेतील व्यासपीठवर उपस्थितांपैकी सागर बेग व आमदार नितेश राणे यांनी मुस्लीम धर्मीयांबद्दल हिंदु समाजामध्ये जातीय व धार्मिक द्वेष निर्माण होवून दोन्ही समाजामध्ये एकमेकांविरुध्द कटु भावना वाढविण्याचा प्रयत्न केला. असा आरोप इमरान खान असलम खान यांनी अचलपुर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीतून केला आहे.

### इन्स्टाग्रामधारकावरही गुन्हा दाखल

आ. नितेश राणे यांची बाईक रॅली सुरु असतांना फेसबुक व इंस्टाग्रामवर लाईव्ह सुरु होते. त्यावेळी इसमांनी अल्पसंख्यांक समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या जातील अशा शब्दांमध्ये त्यांच्या देवतांवर कंमेंट केली व त्या कमेंटचे स्क्रिनशॉट सोशल मिडीया साईट्सवर मोठया प्रमाणात व्हायरल केला, अशा आशयाची तक्रार शेख जमीर शेख जिलानी (40, रा. लालपुल, परतवाडा) यांनी परतवाडा पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी कमेंट करणार्या चार इंस्टाग्राम आयडी धारकांविरुध्द भारतीय न्याय संहितेच्या कलम 299 अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सायबर पोलीसांकडुन संबंधीत आयडी धारकांची ओळख पटवून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जलव्यवस्थापन विभाग, अमरावती**
e-mail ID :- eemjpdivamt@gmail.com Ph. No. 0721-2550538

**निविदा सुचना क्र. ३० सन २०२४-२०२५**

कामाचे नांव :- अमरावती पाणी पुरवठा योजना (देखभाल व दुरुस्ती) अंतर्गत एकुण ११ कामाची निविदा मजीप्रा जलव्यवस्थापन विभाग अमरावती यांचे कडून बी-१ पद्धतीने मागविण्यात येत आहेत. सदर कामा करीता कंत्राटदारांनी कोरी निविदा मिळण्यासाठी अर्ज करावयाच्या दि. ३०/०९/२०२४ दि ०४/१०/२०२४ पर्यंत राहिल व कोरी निविदा विक्री कालावधी दि. ३०/०९/२०२४ पासून दि. ०८/१/२०२४ पर्यंत राहिल. तसेच सिलबंद निविदा सादर करण्याचा दि. १०/१०/२०२४ आहे.

सदर प्रकारची कामे केल्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र सविस्तर निविदेसूचनेत नमूद केल्यानुसार सादर करणे आवश्यक राहिल, अन्यथा कोरी निविदा फॉर्म दिल्या जाणार नाही.

सविस्तर निविदा सुचना पूर्व अर्हताच्या अटी सहित विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर पहावयास मिळेल.

( विवेक सोळंके )
कार्यकारी अभियंता

विमाका/अम./जाही./539

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# दहेंद्री ग्रामपंचायतीला गावकऱ्यांनी ठोकले कुलूप

## गावात पाण्याची कृत्रिम टंचाई | गावकरी आक्रमक



**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी (दि.30)** - चिखलदरा तालुक्यातील दहेंद्री या गावात मागील पंधरा दिवसापासून पाण्याची नळ योजना बंद असल्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. त्यामूळे संतप्त झालेल्या गावकऱ्यांनी ग्रामपंचायत कार्यालयालाच कुलूप ठोकत आंदोलन केले.




या गावाची लोकसंख्या दोन हजाराच्या जवळपास आहे. दुषीत स्त्रोतमधील पाणी गावकरी पीत असल्याने गावात पुन्हा साथरोग पसरण्याची भीती निर्माण झाली आहे. गावातील नागरिकांनी ग्रामपंचायत प्रशासनाची नेहमी पाण्यासंबंधित चर्चा व तक्रार करूनही ग्रामपंचायत प्रशासन मार्फत गावात पाण्याची समस्या सोडविण्यात आली नाही. त्यामुळे संतप्त नागरिकांनी व महिलांनी ग्रामपंचायत कार्यालयाला ताला ठोको आंदोलन करून आपला संताप व्यक्त केला. गावातील पुरुष व महिलांनी ग्रामपंचायत ला कुलूप लावले व ग्रामपंचायत च्या विरोधात नारे बाजी केली. यामध्ये प्रामुख्याने कला पडलीवार. लता येवले, काशी येवले, फुला सेलूकर, गंगा मुंडे, सुरेंद्र पोटे ,संजू पोटे, रोशन बेलकर, काशीराम कास्देकर इत्यादी गावातील नागरिक उपस्थित होते.

मला चार दिवसा आधीच ग्रामपंचायतचा चार्ज मिळाला आहे. पूर्ण चार्ज मिळायचा आहे. खाते बदल सुद्धा व्हायचे आहे. तरी एक-दोन दिवसात फुटलेली पाईपलाईन दुरुस्त करून दहेंद्री गावाचा पाणीपुरवठा सुरळीत करणार आहोत.
**योगेश माहुरे, सचिव ग्रामपंचायत दहेंद्री.**

पाणीपुरवठ्याची मेन लाईन बीडच्या पाईपची आहे व ज्या ठिकाणी पाईपलाईन फुटली आहे, त्या ठिकाणी गावातील एका व्यक्तीचे घर आहे. त्या ठिकाणी खोदकाम करता येत नाही. तात्पुरती व्यवस्था म्हणून आपण पाईप वेल्डिंग करणार आहोत. उद्या पर्यंत पाणीपुरवठा सुरू करू, पाईप लाईन दुरुस्त करणारा कारागीर बोलावला आहे. लवकरच नागरिकांना पाणी मिळेल.
**रवी बेठेकर, सरपंच दहेंद्री.**

पंधरा दिवसापासून पाणीपुरवठ्याची योजना बंद आहे. वारंवार सरपंच, सचिव यांना या बाबतीत सांगितले. वेळोवेळी सांगुन सुध्दा पाणी सुरू झाले नाही. त्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्याची मोठी समस्या आहे. हातपंप व इतर ठिकाणावरून नागरिकांना पाणी भरावे लागते.
**संदीप मुंडे, गावकरी, ग्राम दहेंद्री.**

# नोटीस मिळताच 3650 वाहन चालकांनी भरले ई-चलान

## ■30 लाख 59 हजार रुपयांचा दंड वसुल
## ■लोकअदालतीमध्ये 241 प्रकरणांचा निपटारा



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.30)**- महाराष्ट्र राज्य विधी न्याय प्राधिकरण सेवातर्फे पार पडलेल्या लोकअदालतीत वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी 1,37,582 वाहनधारकांविरुद्ध 3 लाख 14 हजार 280 (20 कोटी 26 लाख 88 हजार 750 रुपये इतकी) प्रलंबित प्रकरणे ठेवण्यात आली होती. वन स्टेट वन ई-चलान प्रकल्पांतर्गत, वाहन चालकांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर न भरलेल्या ई-चलनाच्या दंडाची रक्कम वसूल करण्यासाठी 29 ऑगस्टपासून नोटिसा पाठविणे सुरू करण्यात आले. नोटीस प्राप्त झाल्यानंतर 27 सप्टेंबरपर्यंत 3409 वाहनचालकांनी 28 लाख 50 हजार 100 रुपयांची सेटलमेंट रक्कम भरली आहे. तसेच 28 सप्टेंबर रोजी अमरावती न्यायालय परिसरात झालेल्या लोकअदालतीमध्ये वाहन चालकांनी उपस्थित राहून 241 प्रकरणांमध्ये न्यायालयात तडजोडीची रक्कम भरली. अशाप्रकारे, वाहतूक नियमांच्या उल्लंघनाच्या एकूण 3650 प्रकरणांचे निपटारा करण्यात आले आहे. मोटार वाहन कायद्यांतर्गत प्रलंबित ई-चलान प्रकरणातील तडजोडीची रक्कम वसूल करण्यासाठी अमरावती शहराच्या वाहतुक शाखेकडून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. दरम्यान, गैरसोय टाळण्यासाठी सर्व वाहनधारकांना महाट्रॅफिक ॲप किंवा वेबसाइट लिंकद्वारे त्यांच्या वाहनावरील प्रलंबित ई-चलान तपासून ऑनलाइन किंवा शहर वाहतूक शाखेत तत्काळ सेटलमेंटची रक्कम भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### चालकानी ई-चलानची रक्कम भरावी

वाहनचालकांनी वाहनांवरील प्रलंबित ई-चलान सेटलमेंट रक्कम त्वरित भरावी. सुरळीत व सुरक्षित वाहतूक तसेच रस्ता सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आणि अपघात टाळण्यासाठी वाहतूक विभागाला आवश्यक ते सहकार्य करा. जीवन अनमोल आहे, प्रत्येकाने आपल्या कामाचे नियोजन करून वेळेचे योग्य नियोजन केले पाहिजे, वाहनचालकांनी वेळेचे नियोजन व वाहतुकीचे नियम पाळले, तर जीवघेणे अपघात व वित्तहानी टाळू शकते. तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करून आर्थिक नुकसान टाळण्यासाठी अमरावती शहरातील वाहतूक विभागाने आवाहन केले आहे.

# बळजबरीची चोरी रोखल्याने चाकूने हल्ला

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.30 )**- मावशीला भेटायला जाणाऱ्या तरुणाला बळजबरीने चाकूचा धाक दाखवून लूटणार्या आरोपीला हटकल्याने व विरोध केल्याने आरोपींनी चाकूहल्ला केला. या हल्ल्यात एकजण जखमी झाला. चंदन ठाकूर (नवदुर्गा विहार, कुंभारवाडा) जखमीचे नाव आहे. अल्पवयीन मुलीच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी आरोपी बादल किशोर लुंड (23, माया नगर), यश उर्फ आशु धनराज बहुराशी (24, माया नगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

**राजापेठ येथील हर्ष बारजवळची घटना**

तक्रारदार अल्पवयीन असून तो फ्रेजरपुरा येथील कल्याण वसतिगृहाजवळ भाड्याच्या खोलीत राहून संगणक शास्त्राचे पहिले वर्ष पूर्ण करीत आहे. 29 सप्टेंबर रोजी दुपारी 4 वाजण्याच्या दरम्यान तो मावशीला भेटण्यासाठी एमआयडीसी रोडवरील जय नगर येथे पायी जात होता. यावेळी हर्ष बारच्या मागून आरोपी बादल आणि यश स्कूटरवरून आले. मागे बसलेल्या तरुणाने तन्मयकडे दारू पिण्यासाठी दोन हजार रुपये मागितले. तन्मयने ओळखत नसल्याने पैसे देण्यास नकार दिला. त्यानंतर आरोपीने वाहनातून खाली उतरून या ठिकाणचा डॉन असल्याचे सांगून त्याच्या खिशातील 1000 रुपये जबरदस्तीने हिसकावले. विरोध करण्याचा प्रयत्न केल्यास जीवे मारण्याची धमकीही दिली. त्याच्या खिशातून चाकू काढून जीवे मारण्याची धमकी दिली. दरम्यान, काही अंतरावर उभ्या असलेल्या चंदन ठाकूर याने दोन्ही आरोपींना हटविण्याचा प्रयत्न केला असता, बादल आणि यश यांनी चंदन ठाकूर यांच्यावर चाकूने हल्ला केला. त्यानंतर तक्रारदार अल्पवयीन त्याला रुग्णालयात घेऊन गेला. जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर अल्पवयीन मुलीने राजापेठ पोलिस ठाण्यात तक्रार दिली.

# शेतमजुरावर राप्टर हल्ला

**अमरावती** - आसेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कृष्णापूर गावात राहणारे पंकज राऊत यांनी अंगणात भरतीसाठी माती टाकली होती. त्यावरून त्यांचे शेजारी केशवराव राऊत यांच्याशी वाद झाला. सायंकाळी पंकज चहा पिण्यासाठी बाहेर गेला असता केशवने त्याच्यावर राप्टरने हल्ला केला. पंकजच्या तक्रारीवरून पोलिसांनी केशवराव राऊतविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा पुढिल तपास आसेगांव पोलीस करीत आहे.

# गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी!

## उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.30 )**- एप्रिल 2024 मध्ये मोर्शी तालुक्यात झालेल्या गारपीटीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तीन हेक्टर पर्यंतच्या मर्यादित प्रती हेक्टर 36 हजार रुपये प्रमाणे नुकसान भरपाई देण्यात यावी आणि जाणीवपूर्वक चुकीचा अहवाल पाठविणाऱ्या अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात यावी. या मागणीसाठी मोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांनी आज उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

एप्रिल 2024 मध्ये मोर्शी तालुक्यात झालेल्या गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले होते. त्यावेळी शासनाचे आदेशानुसार तालुका कृषी अधिकारी, खंडविकास अधिकारी आणि तहसीलदार मोर्शी यांना अंबाडा व हिवरखेड महसुली मंडळातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पूर्ण नुकसान भरपाईचे एकत्रितपणे पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले होते. परंतु मोर्शी तहसीलदार, खंडविकास अधिकारी आणि तालुका कृषी अधिकारी या तीनही अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक तीन हेक्टर पर्यंतच्या मर्यादेऐवजी दोन हेक्टर पर्यंतच्या मर्यादेचे नुकसानीचे पंचनामे केले होते. पूर्ण क्षेत्राचे नुकसानीचे पंचनामे न करता 40 ते 45 टक्के नुकसान झाल्याचे पंचनामे शासनाकडे पाठविले होते. त्यामुळे शेतकऱ्याचे अतोनात नुकसान करणाऱ्या मोर्शी तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी आणि खंड विकास अधिकारी यांचे वर प्रशासकीय कारवाई करून त्यांना निलंबित करण्यात यावे आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे प्रतिहेक्टरी 36 हजार रुपये, 3 हेक्टर पर्यंतचे मर्यादित नुकसानीचे पुन्हा पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी या मागणीचे निवेदन मोर्शीच्या उपविभागीय अधिकारी (महसूल) दीपक पवार यांना देण्यात आले आहे.

# 30 ग्रॅम सोन्याची चेन लंपास, जावयावर संशय

## राजापेठ येथील रवीनगर येथील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.30 )** - अंघोळीवेळी काढून ठेवलेली 30 ग्रॅम सोन्याची साखळी चोराने लंपास केली. ही घटना 24 सप्टेंबर रोजी दुपारी 1.45 वाजता राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रवी नगरमध्ये उघडकीस आली. पांडुरंग नानाजी तायडे (59, रा. रवी नगर) यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी संशयित आरोपी मनोज ठाकरे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ते पाडुरंग तायडे यांचे जावई आहेत.

पांडुरंग तायडे हे 24 सप्टेंबर रोजी दुपारी आंघोळीसाठी बाथरूममध्ये गेले होते. यावेळी त्यांनी गळ्यातील 2 लाख 60 हजार रुपये किमतीची 30 ग्रॅम वजनाची सोन्याची चेन काढून ठेवली होती. काही वेळाने त्यांना भाचीचा फोन आला, तिने पांडुरंगकडे चार हजार रुपये मागितले. मात्र आधी दिलेले पैसे परत केले नाहीत तर पुन्हा पैसे कसे देणार, असे पांडुरंगने सांगितले. त्यावर भाचीच्या पतीने फोनवर बोलून वीज बिल भरावे लागेल, अन्यथा लाइन कट करू, असे सांगितले. काही वेळाने तो घरी आला. पांडुरंगाने त्याला पाणी दिले आणि मोसंबीही खायला दिली. दरम्यान, जावई मनोज ठाकरे यांनी मोसंबीचे ताट मागे जाऊन ठेवले. त्यानंतर पांडुरंग यांनी भाचीला घरी बसवले आणि ते पतीसह एटीएममध्ये गेले. तेथून त्याने पैसे काढून मनोज ठाकरे यांना चार हजार रुपये दिले. त्यानंतर 26 सप्टेंबर रोजी रात्री पांडुरंग तायडे हे झोपले होते. त्यानंतर त्यांच्या गळ्यातील चैन पत्नीला दिसली नाही. त्यानंतर साखळीबाबत विचारणा केली असता पांडुरंग यांनी ती बाथरूममध्ये पाहिली, मात्र बाथरूममध्येही साखळी दिसत नसल्याचे सांगितले. पांडुरंग तायडे यांनी घरात लावलेल्या सीसीटीव्हीचे फुटेज तपासले. त्यानंतर त्यांनी राजापेठ पोलिस ठाण्यात याप्रकरणी तक्रार दिली. पांडुरंगने त्यांचा जावई ठाकूर याच्यावर चोरीचा आरोप केला आहे. पोलिसांनी संशयित आरोपी मनोज ठाकूर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# मैदानी व्यायाम शाळेला दिले मेजर ध्यान चंद यांचे नाव

## सैनिक मुलांच्या वसतीगृहात लोकार्पण ■ जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचा पुढाकार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.30 )**- जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या पुढाकारातून शौर्य दिनानिमीत्त रविवार (दि.29 सप्टें.) रोजी नवसारी येथील सैनिक मुलांच्या वसतीगृहात मैदानी व्यायाम शाळेचे (ओपन जीम) लोकार्पण करण्यात आले. अपर जिल्हाधिकारी सूरज वाघमारे यांच्या हस्ते हे लोकार्पण पार पडले. विशेष म्हणजे या मैदानी व्यायाम शाळेला विश्वविख्यात हॉकी पटू दिवंगत मेजर ध्यान चंद यांचे नाव देण्यात आले. यावेळी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर आनंद पाथरकर (सेना मेडल प्राप्त), यांच्यासह क्रीडा विभागाचे कोच, माजी सैनिक व वस्तीगृहाचे विद्यार्थी मोठ्याप्रमाणात उपस्थित होते. सुरुवातीला शौर्य दिन साजरा करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी शौर्य का साजरा करण्यात येतो, याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. विद्यार्थ्यांना आपल्या वस्तीगृहाच्या परिसरातच व्यायाम करण्याची सोय व्हावी याकरिता जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर आनंद पाथरकर यांनी जिल्हा क्रीडा विभागासोबत पाठपुरावा करुन हे 7 लाख रु चे दोन मैदानी व्यायामशाळेचे साहित्य सैनिकी मुल व मुलींच्या वस्तीगृहामध्ये लावण्यात. तसेच शौर्य दिनाच्या औचित्यावर या मैदानी व्यायाम शाळेचे लोकार्पण केले.







### व्यायामाच्या साहित्यांना दिले शहिदांची नावे

जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी आनंद पाथरकर यांच्या संकल्पनेतून बनविण्यात आलेल्या मैदानी व्यायामशाळेमधील प्रत्येक व्यायामाच्या साहित्यांना शहिदांची नावे देण्यात आली. अमरावती जिल्ह्यातील रामराव गाठे, शंकर सांगोले, ओंकार मासोदकर, प्रभाकर म्हसांगे, सुनीलकुमार चौहाण, प्रकाश धांडे, मनीलाल धांडे, पंजाब उईके अश्या आठ वीर जवानांची नावे येथील व्यायाम शाळेतील साहित्यांना पहायला मिळतात. इतकेच नाही, तर यावेळी 8 वीर पत्नी व 2 वीर मातांनाही सन्मानित करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतूक करुन सर्वांना शौर्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# सेवानिवृत्त पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांचा निरोप समारंभ





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 30)** पोलीस आयुक्तालयातील आस्थापनेवर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या पोलिस अधिकारी व कर्मचार्यांना निरोप देण्यात आला. यावेळी आयोजीत निरोप समारंभात पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी सेवानिवृत्त पोलिस अधिकारी व कर्मचारी यांना शाळ, श्रीफळ देऊन सत्कार केला.

### पोलिस आयुक्त यांच्या हस्ते सत्कार

सेवानिवृत्त झालेले सायबरचे पीएसआय चैतन्यकुमार रोकडे, नियंत्रण कक्ष राजेंद्र वाघमारे, पोलीस मुख्यालय एएसआय गजानन खुरकटे, गणेश सोनटक्के यांचा निरोप समारंभ कार्यक्रम 30 सप्टेंबर रोजी पोलीस आयुक्त कार्यालयातील मिटींग हॉल येथे आयोजीत करण्यात आला होता. यावेळी पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या हस्ते पोलीस महासंचालक यांचे शुभेच्छापत्र व स्मृतीचिन्ह, शाल, श्रीफळ, सेवानिवृत्ती प्रमाणपत्र सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदार यांना देण्यात आली, तर त्यांच्या पत्नीस साडी व कुंडीतील रोपटे देवुन कौटुंबिक वातावरणात सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रमकरिता पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर, सागर पाटील, गणेश शिंदे एसीपी शिवाजी बचाटे, प्रशासकीय अधिकारी किशोर शेंडे, कार्यालय अधिक्षक आरती आठवले, मंत्रालयीन कर्मचारी तसेच सेवानिवृत्त झालेले पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे कुटुंबीय हजर होते.

# खेळांमध्ये डाव, चपळता, निर्णयक्षमता फार महत्वाची ठरते

## आ.सुलभा खोडके | महानगरपालिका जिल्हास्तर शालेय कबड्डी स्पर्धा | एकूण 188 संघाचा सहभाग

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.30 )** - खेळ ही एक शारीरिक व मानसिक कला आहे. खेळल्यामुळे शारीरिक विकास साधतो तसेच मानसिकताही प्रबळ बनते. दररोज किमान अर्धा ते एक तास कोणतातरी खेळ खेळला पाहिजे. खेळामूळे चपळता वाढते, त्याचप्रमाणे आपल्या व्यक्तिमत्वाचा विकासही घडतो.

असे प्रतिपादन आमदार सुलभा खोडके यांनी महानगरपालिका जिल्हास्तर शालेय कबड्डी स्पर्धा अर्थातच कबड्डी महासंग्राम चे उद्घाटन प्रसंगी रविवारी(दि.30) केले. खेळाचे वेगवेगळे प्रकार आहेत. वेगवेगळे खेळ वेगवेगळ्या पद्धतींनी खेळले जातात. खेळांमध्ये बैठे खेळ व मैदानी खेळ असे दोन प्रकार आहेत. खेळ हा माणसासाठी असून त्यामुळे मानसिक स्वास्थ लाभते. शालेय मुलांसाठी अभ्यासाबरोबरच खेळही महत्वाचा आहे. म्हणून खेळाचा समावेश शालेय अभ्यासात केला जातो. तसेच मुलांमध्ये गोडी निर्माण होईल असे त्याचे स्वरूप ठेवले जाते. खेळ आरोग्यासाठी चांगले आहे. खेळ हा जीवनातील महत्वाचा घटक



बनलेला आहे. मैदानी खेळ म्हणजे असे खेळ जे मैदानावर खेळले जातात.या खेळांमध्ये संपूर्ण संपूर्ण शरीराची हालचाल होते.मैदानी खेळ खेळल्याने शरीर स्वस्थ राहतं. शरीराचा व्यायाम होतो,आणि शरीर तंदुरुस्त राहते.खेळांमध्ये डाव,चपळता,निर्णयक्षमता फार महत्वाची ठरते. रविवार दिनांक 29 सप्टेंबर 2024 रोजी अमरावती येथे श्री शिवाजी बीपीएड महाविद्यालय समिपस्थ डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख क्रीडांगण,शिवाजी नगर येथे क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत अमरावती जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तसेच जिल्हा कबड्डी अँमेच्युअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने महानगरपालिका जिल्हास्तर शालेय कबड्डी स्पर्धा अर्थात कबड्डी महासंग्राम चे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी व्यासपीठावर विदर्भ कलाध्यापक संघटनेचे अध्यक्ष विनोद इंगोले, जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, शिवाजी बहूउद्देशीय उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक प्रसाद देशमुख, उपमुख्याध्यापक सुधीर माळवे, विनर अकादमीचे संचालक धीरज कुमार, अमरावती महानगर क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक संघाचे अध्यक्ष अजय आळशी, सचिव संदेश गिरी, अमरावती जिल्हा शारीरिक शिक्षण व क्रीडा विषय समितीचे सचिव डॉ.नितीन चवाळे, स्पर्धा संयोजक क्रीडा अधिकारी संतोष वीघ्ने, स्पर्धा समनवयक संतोष अरोरा, संदेश गिरी आदी उपस्थित होते. दिनांक 29 ते 30 सप्टेंबर 2024 दरम्यान आयोजित या दोन दिवसीय स्पर्धा आयोजित स्थानिक मैदानाचे आ.सुलभा खोडके यांच्या हस्ते पूजन करण्यात आले.


## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी व माझे पक्षकार नामे 'निलेश श्रीराम उईके आणि सचिन श्रीराम उईके' यांच्या वतीने सदरची जाहीर नोटिस देतो ती, येनेप्रमाणे,

मिळकतीचे वर्णन -मौजे- चांदुर भाग 1, प्लॉट क्रं. 3, सर्वे क्रमांक 25, ता. चांदुर रेल्वे, जिल्हा. अमरावती.

**चतु. सीमा : पूर्वे :** प्लॉट क्रमांक-4 **पश्चिम :** प्लॉट क्रमांक 2
**उत्तर :** प्लॉट क्रमांक 29, **दक्षिण :** लेआऊट रस्ता

सदर मिळकत माझे पक्षकार 'निलेश श्रीराम उईके आणि सचिन श्रीराम उईके' यांच्या मालकीचे आहे. तदनंतर, त्यांनी SMFG INDIA HOME FINANCE COMPANY LTD. येथे कर्जाकरीता अर्ज केला असता. वरील वर्णनाचे मूळ खरेदीखत दि. 15/06/2012 रोजीचे दस्त क्र. 1346 आणि खरेदीखत दि. 08/10/2015 रोजीचे दस्त क्र. 1128 सदर दस्त गहाळ झालेले आहे. तसेच वरील नमूद दस्त कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान/राष्टीयकृत/खाजगी//पतसंस्था/सहकारी/इतर बँक बोजा, सदर मालमत्तेवीषयी शासकीय-नीमशासकीय-इतर भानगड, कोनाचा मालकी/वारस हक्क किवा इतर आक्षेप असल्यास खाली दिलेल्या माझ्या मो. क्रं. वर ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7 दिवसाच्या आत पुराव्यानीशी हरकत नोंदवावी तदनंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही ही विनंती.

शिक्का

आपला
**Advocate**
**रवींद्र र. वाटाणे**
**स्नेहगंधा कॉलनी, अमरावती**
**मो. नं. 9823698745**